.

**न्यूजर्सीच्या नाट्य रसिकांना मेजवानी – नाट्यदर्पण २०१८**

- नीलिमा कुलकर्णी, न्यूजर्सी

नाट्य हा भाषेच्या पलीकडे जाऊन प्रेक्षकांशी संवाद साधणारा कलेचा आविष्कार! न्यूजर्सीत “नाट्यदर्पण” हा सात बहुभाषी एकांकिकांचा कार्यक्रम मार्च २४, २०१८ला झाला. The Indian Heritage and Cultural Association of NJ ही संस्था असा महोत्सव गेले तीनवर्ष करीत आहे. अमेरिकेतील हौशी कलाकारांनी सादर केलेल्या एकांकिकांच्या या कार्यक्रमाला कलाकारांचा प्रतिसाद दिवसैंदिवस वाढतोच आहे. यावर्षी एकूण २७ नोंदी आल्या. त्यातून तीन इंग्लिश, दोन मराठी आणि दोन हिंदी अशा सात एकांकिका निवडल्या होत्या. भाषेच्या विविधतेबरोबरच वेगवेगळ्या विषयांवरच्या दर्जेदार एकांकिका म्हणजे नाट्यरसिकांना एक मेजवानीच होती.

भरतमुनींच्या ‘नाट्य’ च्या व्याख्येत नाटक, नृत्य आणि संगीत तिन्हीचा समावेश आहे, त्याची प्रचिती हा कार्यक्रम बघताना आली. सुरवात “The music in my blood’ या इंग्लिश एकांकिकेने झाली. मनोज गोविंदराज आणि ऋचा जांभेकर यांच्या अप्रतिम गाण्यांनी नाटक उचलून धरलं. संगीताच्या घराण्यात वाढलेली एक मुलगी प्रेमा, सतत घरातून संगीत आराधना करण्यासाठी येणाऱ्या दबावामुळे त्यापासून दूर पळायचे म्हणून न्युयॉर्कला येते. इथे वाल्टर कॉफमन या जर्मन लेखकाचे पुस्तक वाचताना रक्तात असणाऱ्या संगीतापासून दूर जाता येत नाही याचा तिला साक्षात्कार होतो, आणि ती परत संगीताकडे वळते. अमेरिकन, बंगाली, हिंदी, मराठी असे अनेक भाषक कलाकार या एकांकिकेत होते. विषय छान होता पण कथानक मात्र विस्कळीत होते असं मला वाटलं.

दुसरे इंग्लिश एकपात्री नाटक, “I’m on my own wife” फारच वेगळ्या जगात घेऊन गेले. जर्मनीतील एका ट्रान्सजेन्डर व्यक्तीची, ‘शार्लट वोन मार्सडॉल्फ’ची कथा. नात्झी राज्यात आणि कम्युनिस्ट राज्यात त्याला आलेले अनुभव, त्याने केलेला संघर्ष थॉमस वोन डोलेन या अमेरिकन तरुणाने अतिशय समर्थपणे मांडला. कम्युनिटी कॉलेजमध्ये बक्षीसपात्र ठरलेला हा एकपात्री प्रयोग म्हणजे उच्च दर्जाच्या अभिनयाची साक्ष होती.

भारतीय तरुणांचे कसब ‘रास्तार काथा’ ही इशिता मिली यांच्या IMGE या बंगाली पथकाने सादर केलेल्या बंगाली/इंग्लिश नृत्यनाट्यामध्ये पहायला मिळाले. रस्त्यावरच्या इतर देशी माणसांकडे डोळे उघडून बघायला सांगणारी कथा, एका वेगळ्याच प्रकारच्या नृत्यनाट्यातून आपली कला सादर करणारे त्याचे तरूण कलाकार, दिग्दर्शक, लेखक सर्वांचे कौतुक करावे तेव्हढे थोडेच आहे. ‘ब्रॉडवे शो’च्या तोडीचे हे नृत्यनाट्य होते.

कार्यकमात रंग भरला तो नृत्य असणाऱ्या ‘राई’ या हिंदी नाटकाने. बुंदेलखंडातील झोपड्या, चहावाला असा सुंदर सेट, आणि खणखणीत आवाजात म्हटलेली बुंदेलखंडी गाणी, त्यांचे नाच, अस्सल बुंदेलखंडी रंगीत कपडे रसिकांना त्या वातावरणात घेऊन गेले, या कथेत राई स्त्रियांची व्यथा नुसतीच मांडलेली नाही तर त्याविरुध्द बंड करून त्यातून मार्ग काढणारी नव्या पिढीतील एक मुलगी आशावादाचा सुखद धक्का देऊन जाते.

पण आशावाद नेहमीच माणसाला मार्ग दाखवतो असं नाही, ही सत्यस्थिती ‘हेल्पलेस’ या मराठी एकांकिकेतून दिसून येते. गुंड मागे लागले म्हणून एक मुलगी दार ठोठवून अनोळखी घरात शिरते, तिथली गृहिणी तिला आधार द्यायचे ठरवते पण आपल्या आश्वासनातील फोलपणा तिच्या लक्षात येतो, एक चटका

लावून गोष्ट संपते. केवळ दोनच पात्र असणारी एकांकिका दोन्ही पात्रांच्या अभिनय कौशल्याने समर्थपणे पेलून धरली.

आणखी एक वेगळा विषय ‘जियो मेरे लाल’ या विनोदी एकांकिकेतून हाताळला आहे. आयुष्यातल्या संघर्षामुळे स्मशानवैराग्य आलेल्या पाच जणांची ही कथा. फेसबुकवर सामुदायिक आत्महत्या करण्यासाठी एकजण आमंत्रण देतो आणि त्याच्यासारखे आणखी चार जण जमतात. त्यांच्या निर्णयातला फोलपणा हा विनोदाचा विषय लेखक संदीप करंजकर यांनी समर्थपणे हाताळला आहे. खटकेबाज संवाद सादर करताना थोडा ध्वनीप्रेक्षपणाचा प्रॉब्लेम आला तरी, कलाकारांनी आपला ‘स्टेज प्रेझेन्स’ कायम ठेवून नाटकाची घडी विस्कटू दिली नाही. सर्वांनी आपापली कामे उत्तम केली, नाटकाचा ‘टेम्पो’ कायम ठेवला. हसतहसत आयुष्यावर बोलून गेलेलं हे नाटक खूपच प्रभावी आहे.

तितकाच प्रभावी संदेश सेमीकोलन ह्या मराठी रहस्यकथेने दिला. शेवटपर्यंत उत्कंठा ताणून धरणारी कथा – नुकतेच बदलून आलेले एक कुटुंब, त्यांच्या मुलीला कसलेतरी आवाज येत असतात, सुरवातीला ती घाबरते पण मग ते रहस्य सोडवते. यातली प्रकाशयोजना खूप महत्त्वाची होती, ती अत्यंत प्रभावीपणे हाताळली. आयुष्यातील एखाद्या अवघड दुर्घटनेला कवटाळून न बसता पुढे सरकायला पाहिजे, ‘मूव्ह ऑन’ हा संदेश देत एकांकिका संपली.

अशी ही एकांकिकांची मालिका एकूण आठ तास चालली. मध्यंतरात जेवणाच्या डब्यांची व्यवस्था, दुपारी बटाटेवडे, चहा अशी रसिकांच्या पोटापाण्याची व्यवस्थाही उत्तम होते. मीना देशपांडे, डॉ. गीता घाणेकर यांनी ती बाजू नेहमीप्रमाणे छान सांभाळली. कार्यक्रमाचे संचलन आनंदी नागराजन आणि ईशा चौधरी यांनी नेटकेपणाने केलं. आयोजक डॉ. अशोक चौधरी आणि त्यांच्या सहकाऱ्यानी अतिशय मेहनत करून हा कार्यक्रम घडवून आणला. गेले आठ महिने मेहनत करून कार्यक्रमाच्या दहा दिवस आधीच सगळी तिकिटे संपली, प्रयोग हाउसफुल्ल झाला, हीच  नाट्यदर्पणच्या यशाची पावती आहे. नाट्यदर्पणचे कार्यकर्ते नितीन अष्टेकर, आनंदी नागराजन, स्मिता साठे, संजय शेट्ये, स्नेहल वझे, अशोक वंजारी, आणि सल्लागार डॉ. प्रकाश लोथे, अशोक कामेरकर, सजल मुखर्जी, डॉ. मीना नेरुरकर, डॉ. दीपन रे या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन!

या एकांकिकामधून, The music in my blood यातील संगीत, रास्तार कथातील स्ट्रीट डान्स, ‘राई’चे नृत्य, संगीत आणि व्यथा, I'm my own wife’ ही ट्रान्सजेन्डर व्यक्तीची कथा, ‘हेल्पलेस’मधील ‘विमेन अब्युझ’चा विषय, तर ‘जिओ मेरे लाल’ने विनोदातून दिलेला आणि “सेमिकोलन”ने रहस्यकथेतून दिलेला संदेश अशी सुंदर भेट घेऊन रसिक घरी गेले. खूप विचार करण्यासारखे, खूप शिकण्यासारखे, आजच्या समाजाच्या दृष्टीने आवश्यक असे सामाजिक विषय – त्यांचं नाट्यदर्पण मध्ये पडलेलं समाजाचे प्रतिबिंब फारच हृद्यस्पर्शी  होतं. अशीच विविधता असणाऱ्या एकांकिकांची मेजवानी घेऊन नाट्यदर्पण पुढच्या वर्षी काय आणणार याकडे डोळे लागले आहेत.

***